# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी – ०२२-३०२३३४४४/४४६/४४७ फॅक्स - २२६९ २१०२.

तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


**अधिसूचना :**

क्रमांक:२अ/एडीएम/२०११/प्रमाणपत्रे/६६८

दिनांक : १०.६.२०११

## शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेण्याबाबत

शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी , थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी,एम.फार्मसी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांस केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी खाली नमूद केल्याप्रमाणे संबंधित अभ्यासक्रमासाठी आवश्यक प्रमाणपत्रे त्यासाठी लागणारी कागदपत्रे राज्यातील महसूल विभागाच्या अखत्यारीतील जिल्हाधिकारी / तहसिलदार यांचे कार्यालयातील सेतू केंद्रांकडे सादर करून प्राप्त करुन घ्यावीत.

- **महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)** :

महाराष्ट्र राज्यातील सर्व उमेदवारांना महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

- **जात प्रमाणपत्र (Caste Certificate)** : महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी सदर जात महाराष्ट्र शासनाच्या मागासवर्गीयांच्या अधिकृत यादीमध्ये मोडत असल्याचे संबंधित विद्यार्थ्यांच्या नावे दिलेले जात प्रमाणपत्र आवश्यक आहे.

- **नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र : (Non-Creamy Layer Certificate) :**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त VJ/DT(A)/NT(B)/NT(C) /NT(D)/OBC/SBC या सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या संबंधित प्राधिकाऱ्यांनी दिलेले दि.३१/०३/२०१२ पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) सादर करणे आवश्यक आहे.

**संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश अर्जाच्या स्वीकृतीच्यावेळी उपरोक्त प्रमाणपत्रे सादर करणे अत्यावश्यक आहे याची नोंद घ्यावी.**

सही/-

(डॉ.एस के महाजन)

प्र.संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई